# प्रसिध्दीपत्रक

**महाराष्ट्र विधानपरिषदेची २ पदवीधर व २ शिक्षक मतदार संघाची द्विवार्षिक निवडणूक- २०१८**

महाराष्ट्र विधानपरिषदेतील नाशिक विभागातील एका शिक्षक मतदारसंघातून, कोकण विभागातील एका शिक्षक मतदारसंघातून व २ पदवीधर मतदार संघातून निवडून आलेल्या सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०१८ रोजी संपत असल्याने ते निवृत्त होणार आहेत. सदर रिक्त होणाऱ्या जागा भरण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने दिनांक २४ मे, २०१८ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार सदर निवडणुकीसाठी दिनांक २५ जून, २०१८ रोजी मतदान होणार असून, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्याचा दिनांक २ जुलै, २०१८ आहे.

या निवडणुकीसंदर्भातील काही तक्रार असल्यास ती दाखल करण्याकरीता निवडणुकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक ३१ मे, २०१८ पासून ते दिनांक २ जुलै, २०१८ पर्यंत **कक्ष क्र.६११, निवडणुक शाखा, सामान्य प्रशासन विभाग, सहावा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२** येथे २४ x ७ तत्वावर **"नियंत्रण कक्ष"** प्रस्थापित करण्यात येत आहे. या निवडणुकीसंदर्भात तक्रार सादर करावयाची असल्यास ती उपरोक्त नियंत्रण कक्षातील खालील दुरध्वनी क्रमांकावर करावी.

दुरध्वनी क्रमांक — ०२२-२२०२६४४१

मोबाईल क्रमांक — ९६१९२०४७४६

दिनांक : ३१ मे, २०१८
क्र.बीवायई २०१८/प्र.क्र.४३७/१८/३३

**(अ.ना.वळवी)**
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

Scanned with CamScanner